**<u>ठळक बातम्या</u>**

- हिंद-प्रशांत क्षेत्रात स्थैर्य कायम ठेवण्यात भारत आणि जपान यांची भागीदारी महत्त्वाची असल्याचं परराष्ट्रमंत्र्यांचं प्रतिपादन

- अमूल आणि इफको या भारताच्या सहकार क्षेत्रातल्या कंपन्या जगातल्या अग्रगण्य सहकारी संस्थांमधे पहिल्या दोन क्रमांकांवर

- बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातलं मतदान उद्या/ प्रशासकीय यंत्रणा सज्ज

- क्यूएस जागतिक विद्यापीठ क्रमवारीत आशिया विभागात आयआयटी दिल्लीला देशस्तरावर पहिलं, तर जागतिक स्तरावर ५९वं स्थान

आणि

- छत्तीसगडमध्ये बिलासपूर रेल्वे स्थानकाजवळ रेल्वे अपघातात मृत्यूमुखी पडलेल्यांची संख्या ११वर

**<><><><>**

हिंद-प्रशांत क्षेत्रात स्थैर्य कायम ठेवण्यात भारत आणि जपान यांच्यातली भागीदारी महत्त्वाची भूमिका बजावते, असं प्रतिपादन परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी आज केलं. नवी दिल्ली इथं ८व्या भारत-जपान हिंद प्रशांत मंचाला ते संबोधित करत होते. गेल्या काही दशकांमध्ये या दोन्ही देशांमधली भागीदारी आणखी मजबूत झाली असल्याचं त्यांनी सांगितलं. दोन्ही देशांनी आपापल्या बलस्थानांचा योग्य वापर करण्याचं आवाहन करताना ते म्हणाले…

- ***- होल्ड… बाईट- डॉ. एस. जयशंकर - -***

नुकत्याच झालेल्या पूर्व आशिया परिषदेत जपानचे परराष्ट्र व्यवहार मंत्री तोशिमित्सू मोतेगी यांच्याशी झालेल्या चर्चेत, दोन्ही देशांमधल्या भागीदारीचा तपशीलवार आढावा घेण्यावर एकमत झाल्याची माहिती जयशंकर यांनी दिली.

**<><><><>**

नौदलाच्या मोठ्या टेहेळणी जहाजांच्या श्रेणीतलं तिसरं जहाज इक्षक हे उद्या कार्यान्वित होणार आहे. कोची इथं समारंभपूर्वक या जहाजाचा भारतीय नौदलाच्या ताफ्यात दाखल होऊन हे जहाज नौदलाच्या दक्षिण कमांडमधे तैनात होणार आहे.

कोलकाता इथल्या गार्डन रीच शिपबिल्डर्स अँड इंजिनियर्स लिमिटेडनं बांधलेल्या या जहाजात ८० टक्क्यांपेक्षा जास्त स्वदेशी सामग्रीचा वापर झाला आहे.

बंदरं, जहाजांचे तळ आणि खोल समुद्रातल्या नौवहन मार्गांच्या टेहळणीसाठी हे जहाज उपयुक्त ठरेल. यादृष्टीनं हे जहाज अत्याधुनिक उपकरणं, स्वनियंत्रित पाणबुडी, रिमोट आधारीत नौका, सर्वेक्षणासाठीच्या मोटार बोटी अशा सुविधांनी सज्ज आहे. यासोबतच जहाजावर हेलिकॉप्टर डेकची सोयही उपलब्ध आहे.

**<><><><>**

अमूल आणि इफको या भारताच्या सहकार क्षेत्रातल्या कंपन्यांनी, जागतल्या आघाडीच्या सहकारी संस्था म्हणून स्थान मिळवलं आहे. इंटरनॅशनल कोऑपरेटिव्ह अलायन्स वर्ल्ड कोऑपरेटिव्ह मॉनिटर या संस्थेनं यासंबंधीची २०२५ या वर्षासाठीची यादी अलिकडेच जाहीर केली. त्यात अमूलनं पहिलं तर इफकोनं दुसरं स्थान पटकावलं. दरडोई सकल देशांतर्गत उत्पादनाअंतर्गतच्या कामगिरीच्या आधारावर या कंपन्यांनी हे यश प्राप्त केलं.

अमूलनं ग्रामीण भागाची आत्मनिर्भरता आणि सामूहिक मालकीच्या भावनेनं काम करत लाखो शेतकऱ्यांचं जीवनमान बदललं आहे, तर इफकोनं शाश्वत खत उत्पादन, डिजिटल व्यासपीठांची सुविधा आणि पर्यावरण रक्षणाच्या माध्यमातनं लाखो शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणात योगदान देत, सहकार्याच्या तत्त्वाला खऱ्या अर्थानं मूर्त रूप दिलं आहे. या दोन्ही कंपन्यांच्या या अपदावात्मक कामगिरीची दखल या क्रमवारीतून घेतली गेली आहे.

या यशासाठी केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी दोन्ही कंपन्यांचं अभिनंदन केलं आहे. हे यश म्हणजे अमूलशी जोडलेल्या लाखो महिलांच्या अथक समर्पणाचा आणि इफकोत योगदान दिलेल्या शेतकऱ्यांच्या मेहनतीचा गौरव आहे. हे यशातून सहकार क्षेत्राच्या अमर्याद क्षमतांची प्रचिती येते असं त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याचा प्रचार काल संध्याकाळी संपला. ऐकूया या टप्प्यातल्या प्रक्रीयेविषयी अधिक माहिती…

- - - व्हॉईस कास्ट - - -

*(बिहार विधानसभा निवडणुकीच्या या टप्प्यात १८ जिल्ह्यातल्या १२१ विधानसभा मतदारसंघांमध्ये उद्या मतदान होणार आहे. एकंदर एक हजार ३१४ उमेदवारांचे राजकीय भवितव्य तीन कोटी ७५ लाखांहून अधिक मतदार ठरवतील. प्रचाराच्या शेवटच्या दिवशी, एनडीए आणि महाआघाडीच्या नेत्यांनी आपापल्या पक्षाच्या उमेदवारांच्या समर्थनार्थ मतदारांना आकर्षित करण्यासाठी प्रयत्न केले. पहिल्या टप्प्यात, नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखालील सरकारमधील १६ मंत्र्यांचे राजकीय भवितव्य पणाला लागणार आहे, त्यापैकी ११ भाजपचे आहेत. भाजपकडून उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी आणि विजय कुमार सिन्हा हे अनुक्रमे तारापूर आणि लखीसराय मतदारसंघातून निवडणूक लढवणाऱ्या प्रमुख उमेदवारांमध्ये आहेत. महाआघाडीचे मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार तेजस्वी प्रसाद यादव हे राघोपूर विधानसभा मतदारसंघातून तिसऱ्यांदा निवडणूक लढवत आहेत. पहिल्या टप्प्यासाठी निवडणूक आयोगाने कडक सुरक्षा व्यवस्था केली आहे. निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार, पहिल्यांदाच प्रत्येक मतदारसंघात एक निरीक्षक तैनात केला जाणार असून निवडणूक प्रक्रियेवर बारकाईनं लक्ष ठेवण्यासाठी सर्व मतदान केंद्रांवर वेबकास्टिंग होणार आहे. पुरेशा प्रमाणात केंद्रीय सशस्त्र पोलिस दल देखील तैनात केले जाईल.)*

**<><><><>**

निवडणूक आयोगानं नवी दिल्लीतल्या इंडिया इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट फॉर डेमोक्रसी अँड इलेक्शन मॅनेजमेंट इथं आंतरराष्ट्रीय निवडणूक अभ्यागत कार्यक्रम सुरू केला आहे. या अंतर्गत उद्या होणाऱ्या बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात फ्रान्स, दक्षिण आफ्रिका, बेल्जियम, इंडोनेशिया, फिलीपिन्स, थायलंड आणि कोलंबियासह सात देशांतील एकंदर १४ प्रतिनिधी मतदान प्रक्रिया पाहतील. हा आंतरराष्ट्रीय निवडणूक अभ्यागत कार्यक्रम इतर देशांच्या निवडणूक व्यवस्थापन संस्था आणि आंतरराष्ट्रीय संघटनांसोबतचं सहकार्य वाढविण्यासाठी निवडणूक आयोगाचा एक प्रमुख कार्यक्रम आहे.

**<><><><>**

क्यूएस जागतिक विद्यापीठ क्रमवारी आशिया २०२६मध्ये आयआयटी दिल्लीनं देशस्तरावर पहिलं, तर जागतिक स्तरावर ५९वं स्थान मिळवलं आहे. आयआयटी मुंबई १२९व्या, आयआयटी मद्रास १८०व्या, तर आयआयटी खरगपूर २१५व्या स्थानावर आहे. आयआयएमसी बेंगलोरला २१९, तर आयआयटी कानपूर २२२वं स्थान देण्यात आलं आहे. दिल्ली विद्यापीठाचा समावेश पहिल्या ३५० संस्थांमध्ये झाला आहे. यंदाच्या क्रमवारीत देशातल्या ५४ शैक्षणिक संस्थांचा समावेश आहे.

<><><><>

शीख धर्माचे संस्थापक गुरु नानक यांची आज 5 शे 56 वी जयंती आज साजरी होत आहे. राष्ट्रपति द्रौपदी मुर्मू यांनी गुरुनानक जयंतीनिमित्त  शुभेच्छा दिल्या आहेत. गुरु नानक यांचं जीवन आपल्याला सत्य, न्याय आणि सहिष्णुता या मूल्यांची शिकवण देतं; प्रत्येकाने गुरु नानक देव यांचे आदर्श आपल्या जीवनात आत्मसात करावे आणि समृद्ध राष्ट्र निर्माण करण्यासाठी त्यांनी दाखवलेल्या मार्गाचे अनुसरण करावे असं आवाहनही  राष्ट्रपति मुर्मू यांनी आपल्या संदेशात  केलं आहे.गुरु नानक देवांचं जीवन आणि संदेश मानवतेला चिरस्थायी मार्गदर्शन आणि प्रेरणा देणारा असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या संदेशात म्हटलं आहे.

दरम्यान, गुरु नानक  जयंती निमित्त  देशभरात लंगर. भजन, कीर्तन अशा विविध कार्यक्रमांचं आयोजंन करण्यात  आलं आहे.

कार्तिक पौर्णिमा म्हणजेच त्रिपुरारी पौर्णिमा आज देशभरात श्रद्धापूर्वक पारंपरिक पद्धतीने साजरी होत आहे. ठिकठिकाणी त्यानिमित्त दीपोत्सवांच आयोजन करण्यात आलं आहे.

<><><><>

छत्तीसगडमध्ये बिलासपूर रेल्वे स्थानकाजवळ प्रवासी गाडी आणि मालगाडीच्या अपघातात मृत्यूमुखी पडलेल्यांची संख्या ११वर गेली आहे. काल झालेल्या या दुर्घटनेत २० जण जखमी झाले आहेत. दरम्यान, दुर्घटनेतल्या मृतांच्या कुटुंबांना ५ लाख रुपये, तर जखमींना ५० हजार रुपये नुकसानभरपाई द्यायची घोषणा मुख्यमंत्री विष्णू देव साय यांनी केली.

<><><><>

केंद्रीय राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांच्या उपस्थितीत निवृत्तीवेतनधारकांसाठी आज देशव्यापी डिजिटल जीवन प्रमाणपत्र मोहिमेचा चौथा टप्पा सुरु करण्यात येणार आहे. देशभरातील दोन हजार जिल्हे, उपविभाग, शहरांमध्ये शिबिरांचं आयोजन करण्यात येणार आहे. निवृत्तीवेतनधारकांना निवृत्तीवेतन सुरू ठेवण्यासाठी दरवर्षी हयातीचा दाखला सादर करावा लागतो. नोव्हेंबर २०१४ पासून सरकारनं डिजिटल जीवन प्रमाणपत्र मोहिम सुरू केली आहे.

<><><><>

अमेरिकेत काल एक मालवाहू विमान केंटकी विमानतळावरून उड्डाण केल्यानंतर लगेचच कोसळून तीन कर्मचारी ठार झाले, तर ११ जण जखमी झाले. या अपघाताची चौकशी सुरू आहे.

<><><><>

उत्तर प्रदेशच्या मिर्झापूर जिल्ह्यात चुनार रेल्वेस्थानकाजवळ आज ट्रेनखाली येऊन सहा जण ठार झाले. ट्रेनमध्ये असलेल्या काही महिलांनी फलाटाच्याविरुद्ध बाजूनं उतरायचा प्रयत्न केला, त्यामुळे अपघात झाल्याची माहिती रेल्वे प्रशासनानं दिली आहे. या दुर्घटनेत कुणीही गंभीर जखमी झालेलं नाही.

<><><><>

फिलिपीन्समध्ये काल्मेगी या चक्रीवादळामुळे आतापर्यंत किमान ६६ जणांचा मृत्यू झाला आहे. काल किनाऱ्याला धडकल्यानंतर या वादळाची तीव्रता कमी झाली असली, तरी अद्याप ताशी १३० किलोमीटर वेगाने वारे वाहत आहेत. हे चक्रीवादळ पुढे व्हिएतनामच्या दिशेनं सरकण्याची शक्यता आहे.

<><><><>

ऑल इंडिया फूटबॉल फेडरेशन सुपर चषक स्पर्धेत आज दोन सामने होणार आहेत. मोहमेडन स्पोर्टिंग क्लब आणि गोकुलम केरळ क्लबचा सामना बांबोळी स्टेडीयमवर साडेचार वाजता होईल तर पंजाब फूटबॉल क्लब विरुद्ध बेंगळुरू फूटबॉल क्लब हा सामना संध्याकाळी साडेसात वाजता फोतर्ड्याच्या जवाहरलाल नेहरु स्टेडीयमवर होईल.

//<><><><>//